India for Safe Food
Safe Food - Our Right! No Chemicals, No GM!
http://www.indiaforsafefood.in

प्रति,
मा. केंद्रीय कृषीमंत्री,
भारत सरकार.

**विषयः सुरक्षित अन्न उपलब्ध करणे.**

मा. कृषी मंत्री,

आम्हा भारतीय नागरिकांचा सुरक्षित अन्न हा हक्क आहे व सुरक्षित अन्न उपलब्ध करून देणे हे भारत सरकारचे आद्य कर्तव्य आहे.

आज भारतात अन्न उत्पादनाच्याच वेळी निरनिरळ्या कारणांमुळे प्रदूषित होत आहे. खरे तर निःसंशयरीत्या अनेक संशोधनाद्वारे व प्रत्यक्ष अनुभवाद्वारे हे सिद्ध झाले आहे की विषारी रसायने वापरलेल्या आणि धोकादायक, कायम स्वरूपी बिघाड करणाऱ्या जी.एम. (जनुकीय बदलाचे तंत्रज्ञान) तंत्रज्ञानाशिवाय केलेली शेती ही अधिक उत्पादक व आर्थिक दृष्टया फायद्याची होते.

सेंद्रीय शेती - रसायन विरहित शेती या पद्धती जास्त पर्यावरणस्नेही, अधिक उत्पादक आणि आरोग्यकारक असतानाही या शेतीला संशोधनासाठी व प्रसारासाठी समान संधी उपलब्ध करून दिली जात नाही. खरे तर जास्तीत जास्त जमीन सुरक्षित व शाश्वत शेतीसाठी वापरात आली पाहीजे.

**म्हणूनच, आम्ही मागणी करतो की सुरक्षित अन्नाच्या उपलब्धतेसाठी शासनाने खालील योजना ठामपणे अंमलात आणाव्यात.**

- अन्न उत्पादनाची साखळी विषारी रसायने आणि जी.एम. (जनुकीय बदलाची शेती) पिकांपासून मुक्त ठेवूत सेंद्रीय/नैसर्गिक पर्यावरणस्नेही शेतीच्या प्रचार आणि प्रसारासाठी योग्य गुंतवणूक करावी. तसेच अशी शेती करणाऱ्या शेतकऱ्याला योग्य सवलती द्याव्यात.
- सेंद्रीय अन्नाची बाजारपेठ शेतकऱ्यांसाठी व जनतेसाठी उपलब्ध करावी (सुरुवातीला कमीत कमी १ दुकान ५०,००० च्या लोकसंख्येसाठी) जेथे माफक दरात निरनिराळ्या प्रकारचे अन्नपदार्थ सातत्याने मिळू शकतील. (रेशनिंगच्या वितरण व्यवस्थेच्या यात उपयोग होऊ शकतो).
- लहान मुले, गरोदर स्त्रिया, बाळंतिणी यांना विषमुक्त अन्न पुरवण्याच्या शासकीय योजना राबवाव्यात.
- कॅन्सर, विकलांगता आणि जनुकीय बदल घडविणाऱ्या तसेच इतर देशांमध्ये बंदी असणाऱ्या अत्यंत धोकादायक आणि विषनिर्मिती करणाऱ्या कीटकनाशकांवर तात्काळ बंदी घालून सुरक्षित अन्नपुरविण्यासाठी ठोस पाऊल उचलावे.

**आपले नाव व सही :** **ई-मेल :**

**फोन :** **शहर :** **राज्य :**